Review Of Research
Vol. 3, Issue. 2, Nov. 2013
ISSN:-2249-894X Available online at www. lbp.world

ORIGINAL ARTICLE

# छ.शाहू महाराजांच्या काळातील सातारा शहराचा विकास

**प्रा. बोडखे संजीव सुखलाल**
इतिहास विभाग , शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद,
ता.खंडाळा जि.सातारा.

**प्रस्तावना**

इ.स.1707 साली औरंगजेब बादशहा मरण पावल्यावर शाहू महाराजांची त्याच्या छावणीतून सुटका झाली आणि ते सातान्यात आले. 12 जानेवारी 1708 रोजी छ.शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि ते मराठी सत्तेचे छत्रपती झाले. येथून पुढे सन 1848 पर्यत सातारा हिच मराठयांची अधिकृत राजधानी होती. इ. स.1708 ते इ.स.1749 या काळातील मरांठयांच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटनेशी सातान्याचा संबंध आहे. छ.शाहूच्या काळात सातारा शहराचा खऱ्या अर्थाने विकास होण्यास सुरूवात झाली.तेव्हा छ. शाहू महाराजांनी सातारच्या किल्ल्यावरून आपला निवास सातारा शहराची वस्ती वाढवून केला. तेव्हापासून सातारा शहराचा हळूहळू विकास होत गेला.

**छ.शाहूपुर्व सातारा शहर**

सातारा किल्ला सहयाद्री पर्वत रांगातील महत्त्वाचा डोंगरी किल्ला आहे. इ.स.पू.200 च्या सुमारास हा प्रदेश बौध्दांच्या प्रभावाखाली होता. इ.स.90 ते इ.स.300 पर्यंत हा प्रदेश सातवाहन साम्राज्याचा एक भाग होता. काही ताम्रपटावरून इ.स.300 नंतर हा प्रदेश चालुक्य राजांच्या अधिपत्याखाली होता असे दिसते.[1] या किल्ल्यावर कोठेही शिलालेख वगैरे काही सापडले नाही. सातारा किल्ल्याचा उल्लेख बहामनी राजा महमूदशहा (1358 ते 1365) च्या काळातील कागदपत्रात आढळतो. त्याने हा किल्ला दुरूस्त केला असावा असे वाटते.बहामनी काळानंतर या किल्ल्याच्या संदर्भातील अनेक घटनांचा उल्लेख कागदपत्रात आलेला आहे. इ.स.1579 मध्ये विजापूरचा एक सरदार किशवरखानाने विजापूरची राणी चांदबिबी हिच्यावर काही आरोप ठेवून तिला या किल्ल्यावर कैदेत ठेवले होते.[2] 27 जुलै, 1673 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला ताब्यात घेतला होता. कर्नाटक मोहिमेवर जाण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज डिसेंबर 1675 ते जानेवारी 1676 पर्यंत काही काळ आजारी होते.त्यावेळी त्यांचा मुक्काम सातारा किल्ल्यावर होता.[3] त्यावेळी महाराजांनी फार मोठया प्रमाणावर दानधर्म केला होता.या किल्ल्यास मराठयांच्या राजधानीचा मान प्रथम छत्रपती राजारामाने दिला. त्यांनी जून 1698 मध्ये आपली राजधानी विशाळगडावरून सातारा येथे आणली.[4] 8 डिसेंबर 1699 ते 21 एप्रिल 1700 या काळात औरंगजेब बादशहाने किल्ल्याला वेढा देऊन शेवटी किल्ला ताब्यात घेतला व त्याने किल्ल्याला आजमतारा असे नाव दिले. सन 1706 मध्ये किल्ला ताराबाईचा सरदार परशूरामपंत प्रतिनिधीने पुन्हा काबीज केला तेव्हा महाराणी ताराबाई यांनी किल्ल्याला अजिंक्यतारा असे नाव दिले.[5] मोगली कैदेतून सुटका झाल्यानंतर शाहूने तातडीने कूच करून अवघ्या आठ महिण्यात अजिंक्यतारा किल्ला जिंकून घेतला व 12 जानेवारी, 1708 रोजी या किल्ल्यावरच आपला राज्याभिषेक करवून घेतला. त्यानंतर सुमारे 110 वर्षे मराठी राज्याच्या राजधानीचे ठिकाण सातारा हेच राहिले.

सातारा शहर आज जिल्हयाचे प्रमुख ठिकाण आहे. हे शहर छत्रपती शाहू महाराजांच्या काळात वसलेले आहे. या शहराचे सुरूवातीचे नाव शाहूनगर असे होते. आज सातारा शहर पुणे बंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 वर पुण्याच्या दक्षिणेस 111 किलोमीटर अंतरावर व कोल्हापूरच्या उत्तरेस 124 किलोमीटर अंतरावरील महत्त्वाचे शहर आहे. मराठा राज्याच्या राजधानीचे ऐतिहासिक शहर म्हणून प्रसिध्द आहे.बाळाजी विश्वनाथ यांनी छ.संभाजी महाराजांची पत्नी येसूबाईस मुघल छावणीतून सोडवून आणल्यावर ती या सातारच्या किल्ल्यावर राहू लागली. त्यावेळी छ.शाहूने किल्ल्याखाली नवे शहर वसविले व त्याच्या नावावरून त्यास शाहूनगर हे नाव पडले.[6]

छ.शाहू राज्याचा कारभार पाहू लागला.त्यावेळी सातारा हे राजधानीचे ठिकाण होते. छ.शाहूच्या राज्याचा विस्तार वाढू लागल्याने शाहू व त्याचे मंत्री, सरदार हे वाडे बांधून राहू लागले. छ.शाहूच्या काळात प्रारंभी पाणीपुरवठयाचे नळ नसल्याने विहिरी खणून पाण्याची सोय केली जात होती.त्यामुळे या पेठातून विहिरींचे मोठे प्रमाण पाहावयास मिळते.पुढे छ.शाहूने खापरी नळाद्वारे यवतेश्वर डोंगरावरून सातारा शहरास पाणीपुरवठयाची सोय केली. तसेच किल्ल्यावरून राजधानी पायथ्याला आणल्याने सातारा शहराचा आणखी विस्तार झाला.[7] तेव्हा छ. शाहू महाराजांच्या काळातील शहराचे वर्णन पुढीलप्रमाणे देता येईल.

छ.शाहूच्या काळात सातारची जी जुनी वस्ती होती त्यामध्ये माची, मंगळवार पेठ, चिमणपुरा पेठ, शुक्रवार पेठ, व्यंकटपुरा पेठ, यादोगोपाळ पेठ व केसरकर पेठ एवढाच विस्तार होता. तेव्हा या पेठांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

**1) माची**

खतिबाच्या मशिदीच्या पूर्वेस शेखमिरे यांची पागा होती. शेखमिरे हे आदिलशाहीत वाईचे सुभेदार होते. त्यांनीच प्रतिनिधीस कैद करून सातारचा किल्ला शाहूस मिळवून दिला होता. म्हणून शेखमिरे यांना ही जागा दिली होती. तिला माची असे म्हटले जात होते. माचीवर अदालतीच्या वाडयाच्या पलिकडे खतीबाचे घर व मशीद आहे. तसेच डफळयाची पागा, अक्कलकोटकरांचा वाडा व पिंगळयांचा वाडा याचे अवशेष आहेत.[8]

माची भागातून उरमोडीखोऱ्यात डोंगर ओलांडून जाणे त्रासाचे होते. दक्षिणेकडे कराडकडे किंवा परळी किल्ल्याकडे जाण्यासाठी बोगदा बांधण्याचे काम सन 1855 मध्ये कॅ.पी.एल.हॅरी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. त्यावेळी ओगिल्व्ही हा साताऱ्याचा कमिशनर होता.या बोगद्यासाठी एकूण 29000 रूपये खर्च आला होता.[9]

**2) मंगळवार पेठ**

इ.स.1700 मध्ये मंगळाईचा बुरूज औरंगजेबाच्या बाजूने उडवून देणारे डफळे नावांचे सरदार होते. ते पुढे शाहूचे मांडलिक झाल्याने त्यांचा वाडा या ठिकाणी होता. या पेठेत दिवेकरांचा हौद नावाचा ओळखला जाणारा हौद छ.शाहू महाराजांनी बांधला होता.

छ. शाहूची चौथी राणी सगुणाबाई हिला धनीण म्हणत होते. तिची राहण्याची सोय ज्या ठिकाणी केली होती. त्या बागेस धनिणीची बाग असे म्हटले जाते.या ठिकाणी बंगलेवजा एक वाडा बांधलेला होता. तो वाडा 23 एप्रिल 1875 रोजी जळाला. येथे आंबा, फणस, नारळ, देवदार वगैरेंची झाडे होती.

या पेठेत काळाराम मंदिर आहे, गुजराचे भाई घराण्याने छ.प्रतापसिंह महाराजांना फार मोठया प्रमाणावर मदत केली होती. त्यामुळे छ.प्रतापसिंह महाराजांनी गुजर भाईकडे वंशपरंपरागत खजिनदारी दिली होती. त्याला दरमहा 150 रूपये पगार होता.या गुजरांनी या पेठेत एक मंदिर बांधले होते. हे मंदिर भाईचा राम अगर गुजराचा राम या नावाने ओळखले जाते.

सन 1820–30 च्या दरम्यान विठोबाचे मंदिर जोती गोपाळा देशपांडे उर्फ जोतीपंत दादा महाभागवत यांनी बांधले. या मंदिराजवळ पाण्याचा एक उसासा आहे. म्हणून त्या देवळास विठोबाचा नळ असे म्हणतात. मंगळवार पेठेतच फरासखाना मोडतो. महाराजांच्या दरबारातील कपडे स्वच्छ ठेवण्याचे हे ठिकाण होते.

त्यासाठी जवळच एक तळे होते. त्या पाण्याचा उपयोग सरकारी कपडे धुण्यास व जवळच्या बागेस होत असे. इंग्रज सरकारने नगरपालिकेस ही इमारत 2000 रूपयास विकली.[10]

### 3) चिमणपुरा पेठ

चिमणाजी दामोदर मोघे म्हणून छ. शाहूचा सरदार होता. त्याची पागा या पेठेत होती. त्याच्या नावावरून चिमणपुरा नाव पडले आहे. या सरदाराने ही पेठ वसविली. छ.शाहूने चिमणाजीस एक लहानशी जहागीर खानदेशात दिली होती.जळगाव जवळ रिंगणगाव येथे यांचे एक वंशज आहेत.[11]

ढवळपुरा म्हणून एक भाग चिमणपुऱ्यात आहे.छ.शाहू महाराजांच्या काळात कापडाचा धंदा फार महत्त्वाचा होता.कापडाची मोजदाद करण्यासाठी त्या काळात सोने चांदी प्रमाणे करीत असत. प्रत्येक सरदार आपल्या गावी कापड विकणारे लोक बाळगत असत. छ.शाहू महाराजांना शिकारीप्रमाणेच मासेमारीचा छंद होता.मासे गळाने मारीत असत. त्यासाठी बारीक सूत लागे, ते सूत बुऱ्हाणपूरहुन आणले जात असे.ही उणीव भरून काढण्यासाठी कापडी शिंपी लोकांची वस्ती येथे केली. या लोकांमध्ये ढवळे नावाचा शिंपी प्रमुख होता. म्हणून या भागास ढवळपुरा म्हणत असत.[12]

### 3)शुक्रवार पेठ

छ.शाहू महाराजांचे पूर्वापार कारभारी, आश्रित व सेवेकरी आदि छत्रपतींशी संबधित मंडळी प्रामुख्याने या भागात वस्ती करून आहेत. या पेठेत मोती तळे, बाजीरावाची विहीर, जलमंदिर, गोजरा साहेबांचा वाडा, ही ऐतिहासिक दर्शनीय स्थळे या पेठेतच आहेत.[13]

### 4)व्यंकटपुरा पेठ

इचलकरंजी संस्थानचे संस्थापक घोरपडे यांच्या घराण्यात व्यकंटराव नावाचे गृहस्थ होऊन गेले. त्यांची पागा या पेठेत होती.व्यंकटराव हा पेशवा बाळाजी विश्वनाथ याचा जवाई होता. त्याने कोकणातून ब्राह्मण कुटुंबे आणून या पेठेत वसविली. तेथे पाण्याच्या सोईसाठी एक विहीर खणली होती. सन 1739 मध्ये व्यंकटराव छ. शाहू महाराजांच्या तर्फे पोर्तुगीजावर चालून गेला होता.[14]

### 5) यादोगोपाळ पेठ

छ.शाहू महाराजांच्या काळात यादव गोपाळ खटावकर नावाचा एक महाराणी ताराबाईचा कारभारी होता. त्याच्या नावावरून या पेठेला यादोगोपाळ पेठ हे नाव पडले आहे. या पेठेतील मारूतीचे मंदिर ही त्या काळातील सातारा शहराची उत्तर बाजूची सीमा होती. हा मारूती वेशीतील मारूती म्हणून प्रसिद्ध होता. खटावकरांचे वंशज आजही तेथे राहतात.त्यांना जामदारखाने म्हणतात.

या पेठेस पेठखालसा असे म्हणतात. कारण यादव गोपाळ यास छ.शाहूने खालशाचे उत्पन्नाची बाब तोडून दिली होती. यावरून यादव गोपाळ खालशे हे आडनाव पडले होते. साताऱ्यास सचिवांचा वाडा आहे. सरकारी पीलखान्याचा खर्च सचिवाने भागवावा असे ठरले होते. यादव गोपाळ पेठेतच पीलखाना होता. तो पूर्वी रंगमहालाजवळ होता. छ.शाहु महाराजांची स्वारी रंगमहालातून निघून अदालतीवरून यादव गोपाळ पेठेतून वाडयात जात असे.[15]

### 6) केसरकर पेठ

औरंगजेब बादशहाच्या आज्ञेने छ.शाहू महाराजांना पकडून नेले होते. त्यावेळी या लोकांत जोत्याजी केसरकर हा मराठा नोकर होता.त्याने निष्ठेने छ.शाहू महाराजांची सेवा केली.त्यामुळे कैदेतून सुटून आल्यावर छ.शाहू महाराजांनी त्याला बिनीचा सरदार केले.त्याचे घर या पेठेत होते. दसऱ्याचे दिवशी मिरवणुकीत जरी पटका व भगवा झेंडा धरण्याचा मान केसरकरास असे. त्याचे वंशज या पेठेत राहतात.गोपाळराव पंडितराव

राजोपाध्ये यांनी या पेठेत अमृतेश्वराचे मंदिर बांधले. त्याचा जीर्णोद्धार त्याचे प्रपौत्र कृष्णराय अमृतराय यांनी केला.[16]

अशा प्रकारे छ.शाहू महराजांच्या काळात सातारा शहराची वस्ती होती.ही वस्ती विस्तारण्याकामी छ. शाहू महाराजांचे योगदान मोठे होते. पुढे ब्रिटिश काळात प्रतापसिंह महाराज व त्यानंतरच्या छत्रपतींनी सातारा शहराचा विस्तार केला होता. ब्रिटिशांनी सातारा शहराचा विकास करत असताना वेगवेगळया पेठांना वेगवेगळी नावे दिली होती.

छ.शाहू महाराजांनी पुढील वाडयाचे बांधकाम केलेले आहे. त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

### 1) अदालत वाडा

छ.शाहू महाराजांनी सातारा शहरात न्यायदानाचे काम करण्यासाठी अदालत वाडा बांधला. पेशवे काळात या वाडयाचा उपयोग खाजगी वापरासाठी केला जात होता. या वाडयाचे प्रवेशद्वार साधे असून न्यायासनाकडे जाण्यासाठी इमारतीभोवताली मोठया आयताकृती बारा पायऱ्या आहेत. सन 1876 पर्यत या राजवाडयाचा वापर न्यायालयासाठी केला जात होता. त्यानंतर मात्र नवीन राजवाडयाचा वापर न्यायालयासाठी होऊ लागला.

### 2)तख्ताचा वाडा व रंगमहाल

तख्ताचा वाडा छ.शाहू महाराजांनी बांधला आहे. या वाडयात छ.शाहू महाराजांचे सिंहासन होते. म्हणून त्यास तख्ताचा वाडा म्हणत. या वाडयाजवळच असलेल्या विहीरीस तख्ताची विहीर म्हणतात.

रंगमहाल ही वास्तू अदालतवाडयाच्या पूर्वेस सुमारे 200 मी.अंतरावर आहे. छ.शाहूच्या राण्यांचा राणीवसा येथे होता म्हणून या इमारतीस रंगमहाल असे नाव देण्यात आले. सन 1874 मध्ये वास्तूस लागलेल्या आगीत ती इमारत भस्मसात झाली होती. याच वाडयात छ.शाहू महाराजांचा मृत्यू झाला होता.[17]

अशाप्रकारे छ.शाहू महाराजांनी सातारा शहरात पेठांची व ऐतिहासिक राजवाडयांची निर्मिती करून सातारा शहराचे महत्त्व वाढविले होते.छत्रपती शाहूंचा मृत्यू 15 डिसेंबर, 1749 रोजी झाला.

### समारोप

छ.शाहू महाराजांनी सातारा येथे आपला राज्यभिषेक करून घेतल्यानंतर सातारा किल्ल्याऐवजी किल्ल्याच्या पायथ्यास शाहूनगर हे गाव वसविले. त्याचेच पुढे सातारा शहर निर्माण झाले.तेव्हा छ.शाहू महाराजांनी सातारा शहरात माची, मंगळवार पेठ, चिमणपुरा पेठ, शुक्रवार पेठ, व्यंकटपुरा पेठ, यादोगोपाळ पेठ व केसरकर पेठ या पेठांची निर्मिती केली. तसेच अदालत वाडा , तख्ताचा वाडा व रंगमहाल यांची निर्मिती करून सातारा शहराचे महत्त्व वाढविले होते.

### संदर्भ

1) सातारा शहर, नगरपालिका शतसांवत्सरकि महोत्सवी अंक, 1954, पृ.2
2) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सातारा जिल्हा, 1999, पृ.895
3) कित्ता, पृ.896
4) कुलकर्णी अ.रा., 'दि मराठाज् हिस्ट्री ऑफ मेडिव्हल डेक्कन', खंड 1, पृ.350–351
5) सरदेसाई गो.स., 'न्यू हिस्ट्री ऑफ दि मराठाज्', खंड1, पृ.350–351
6) माटे गो.रा., असा घडला सातारा जिल्हा, 1988, पृ.25
7) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड 4, 1990, पृ.198
8) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, 1999, पृ.901
9) Satara District Gazetter 1885, P.560
10) माटे गो.रा.उपरोक्त, पृ.26

11) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, 1999,उपरोक्त, पृ.902
12) माटे गो.रा.उपरोक्त, पृ.26
13) कित्ता, पृ.27
14) कित्ता, पृ.27
15) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, 1999,उपरोक्त, पृ.902
16) कित्ता, पृ.29
17) कित्ता, पृ.903